# 7.1.11 - National and International Commemorative days







World Environment Day Online Quiz Competition on 5$^{th}$ June 2022







World Population Day Online Quiz Competition on 11$^{th}$ June 2022





World Ozone day Guidance by Dr. Rakesh Patil & Students Attend Guest Lecture on 16$^{th}$ Sep. 2022







## Ozone Day Online Quiz Competition on 16 September 2022



नाशिक रोड : बिटको महाविद्यालयात बोलताना डॉ. राकेश पाटील.

### बिटको महाविद्यालयात व्याख्यान

**नाशिक रोड :** ओझोनचे संरक्षण करणे व पर्यायाने पर्यावरणाचे संरक्षण करणे आपल्या हातात आहे. वृक्ष लागवड, वाहनांचा कमीत- कमी वापर किंवा पब्लिक ट्रान्स्पोर्ट वापर, सीएफसीचा योग्य वापरून पर्यावरणाचे संरक्षण करावे, असे प्रतिपादन एल. व्ही. एच कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. राकेश पाटील यांनी केले. येथील बिटको महाविद्यालयात जागतिक ओझोन दिनानिमित्त ओझोनचा मानवी जीवनावर व पर्यावरणावर होणारा परिणाम या विषयावर आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. या वेळी प्राचार्या डॉ. मंजूषा कुलकर्णी, भूगोल विभागप्रमुख व उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार पठारे, डॉ. अर्चना पाटील, प्रा. नरेश पाटील उपस्थित होते. प्राचार्या डॉ. कुलकर्णी यांनी ओझोनचे मानवी जीवनावर होणारे परिणाम व संरक्षणासाठी उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. अनिलकुमार पठारे यांनी ओझोन दिनाविषयी माहिती

दैनिक सकाळ वृत्तपत्र दिनांक: 18/09/2022





World Geography Day celebrated e on 14th January 2023











## बिटको महाविद्यालयात भौगोलिक प्रदर्शन

**नाशिकरोड (प्रतिनिधी)** :- विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर कौशल्ये प्राप्त करताना बोलण्याची कला अवगत करण्याची सांगत भूगोल विषयात लोकसंख्या विश्लेषण, ग्रामीण विकास, पर्यावरण या क्षेत्रात समाजसेवी व शासकीय सेवेत संधी मिळू शकते, तसेच भूगोलतज्ज्ञ म्हणून विविध विभागात व संशोधन क्षेत्रात कामाची संधी मिळू शकते, असे क्रांतिवीर व्ही. एन. नाईक कॉलेजमधील प्रा. स्नेहल कासार यांनी सांगितले.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात जागतिक भूगोल दिनानिमित्त आयोजित भौगोलिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना 'भूगोल विषयातील संधी' या विषयावरील व्याख्यानात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या स्नेहल कासार यांच्या समवेत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजूषा कुलकर्णी, प्रा. नरेश पाटील, डॉ. सुधाकर बोरसे, प्रा. लक्ष्मण शेंडगे अगदी मान्यवर उपस्थित होते.

बीएससी व बीएच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला होता. यात उपग्रह संपर्क यंत्रणा, सूर्यमाला संरचना, विविध प्रदेश अतिनील किरणांचे मानवावर होणारे परिणाम अशा विविध विषयांवरील विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प सादर केले होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी सांगितले, की विषयाला शास्त्राचा दर्जा मिळवून देणारे डॉ. सी. डी. देशपांडे यांच्या स्मरणार्थ १४ जानेवारी रोजी भूगोलदिन साजरा केला जातो तसेच सहभागी विद्यार्थ्यांनी सादरीकरण केलेला महत्त्व द्यावे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. सुधाकर बोरसे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय लक्ष्मण शेंडगे यांनी केला तर आभार प्रा. नरेश पाटील यांनी मानले. याप्रसंगी भूगोल विषयावरील ऑनलाईन स्वरूपात प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रकल्प व प्रश्नमंजूषा स्पर्धेतून तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.



## बिटको महाविद्यालयात भौगोलिक प्रदर्शन

**गोरेवाडी** : विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर कौशल्ये प्राप्त करताना बोलण्याची कला अवगत करावी. भूगोल विषयात लोकसंख्या विश्लेषण, ग्रामीण विकास, पर्यावरण या क्षेत्रात समाजसेवी व शासकीय सेवेत संधी मिळू शकते. भूगोलतज्ज्ञ म्हणून विविध विभागांत व संशोधन क्षेत्रात कामाची संधी मिळू शकते, असे प्रतिपादन क्रांतिवीर व्ही. एन. नाईक महाविद्यालयातील प्रा. स्नेहल कासार यांनी केले. नाशिक रोड येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बिटको महाविद्यालयात जागतिक भूगोल दिनानिमित्त भौगोलिक प्रदर्शन आयोजित केले होते. त्यावेळी 'भूगोल विषयातील संधी' या विषयावर ते बोलत होते. यावेळी प्राचार्या डॉ. मंजूषा कुलकर्णी, प्रा. नरेश पाटील, डॉ. सुधाकर बोरसे, प्रा. लक्ष्मण शेंडगे उपस्थित होते. डॉ. सुधाकर बोरसे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय लक्ष्मण शेंडगे यांनी करून दिला. प्रा. नरेश पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी भूगोल विषयावरील ऑनलाइन स्वरूपात प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रकल्प व प्रश्नमंजूषा स्पर्धेतून तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

दै.लोकनामा दि.20/01/2023